## निशाण १३८ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र.८ शिवाजी कोंडिबा पवार यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादीचे कथन असे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.८ शिवाजी कोंडिबा पवार हे दि.२७/११/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी यांचे मृत्यू पश्यचात त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबतची माहिती तसेच त्यांचे मृत्यू बाबतची माहिती वादी यांचेकडून अनावधानाने व अज्ञानपणामुळे वकीलांना देण्याचे राहून गेल्यामुळे प्रतिवादी क्र.८ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाहीत. यातील प्रतिवादी क्र.२ ताराबाई रामचंद्र पवार या दि.२०/११/२०२३ रोजी मयत झालेबाबतची माहिती वादीचे वकीलांना वादीने दिली त्यावेळीच वादीने सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.६, ८, १२ व १३ मयत असलेबाबतची माहिती वादीचे वकीलांना दिली. त्यानंतर सदर प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक असलेलेची माहिती वादीस वकीलांकडून समजल्यानंतर वादीने प्रतिवादी क्र.८ यांचा मृत्युचा दाखला मिळणेकरिता सांगोला नगरपरिषद कार्यालयात चौकशी केली असता प्रतिवादी क्र.८ यांच्या मृत्युची नोंद सांगोला नगरपालिका कार्यालयात नसलेचे संबंधित कार्यालयाकडून वादीस सांगण्यात आले त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र.८ यांचा मुत्युचा दाखला उपलब्ध होवू शकला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.८ चे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता सुमारे १२ महिन्यांचा विलंब झालेला आहे. वादीने सदरचा विलंब हा जाणीवपूर्वक केलेला नाही. दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.८ चे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे व आवश्यक आहे म्हणून झालेला १२ महिन्यांचा विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती केली.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादी तर्फे म्हणणे देण्यात आले. प्रतिवादीचे कथन की, अर्जातील मयत वारस हे वादीचे जवळचे नातेवईक असूनही कसलेही योग्य कारणाािशवाय मुदतीत वारस रेकॉर्डवर आणले नाहीत. अर्जातीील कारण कारण खरे नाही. अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द डिक्लेरेशन, वाटपाचा व पृथक कब्जाचा दाखल केलेला आहे. वादीने सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्र.८ यांचा मृत्यूचा दाखला मिळणेकरिता सांगोला नगरपालिकेत चौकशी केला असता प्रतिवादी क्र.८ यांच्या मृत्यूची नोंद नसल्याचे

संबंधित कार्यालयाकडून वादीस सांगण्यात आलेले आहेत. त्यामुळे वादीस प्रतिवादी क्र.८ यांचा मृत्यूचा दाखला उपलबध होवून शकला नाही असे आपल्या अर्जात नमूद केले आहे. तसेच त्यांनतर प्रतिवादी क्र.८ यांच्या वारसांची नावे, वय, पत्ता वकीलांकडून देवून या अर्जासोबत प्रतिवादी क्र.८ चे वारस रेकॉर्डवर घेणेकरिता सदरचा प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. सदर कथनाच्या पृष्ठर्थ वादीने नि.१३९ ला शपथपत्र दाखल केलेले आहे. वादीने अर्जात नमूद कारण तसेच दाव्यातील मागणी पाहता दाव्याची दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणेसाठी प्रतिवादी क्र.८ च्या वारसांना अभिलेखावर घेणेची संधी देणे हे न्यायाचे ठरेल. जर वादी यांना प्रतिवादी क्र.८ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांचे न्याय हक्कापासून वंचित राहू शकतात. परंतू वादीने प्रतिवादी क्र.८ च्या वारसास मुदतीत रेकॉर्डवर समावेश न केल्यामुळे प्रतिवादीस विनाकाराण विलंब व मानसिक त्रास सहन करावा लागला त्यामुळे सदरची बाबत वादीवर खर्चाचे आदेश पारीत करुन काही अंशी कमी करता येवू शकतो. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे  आदेश पारीत करण्यात येतो–

**आदेश**

१. अर्ज वादीने रक्कम रुपये ४००/– प्रतिवादीस खर्च देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.८ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

दिनांक – ३०/०८/२०२४.

**सही/–**
(एस.एस. साळुंखे)
३ रे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.